आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ नोव्हेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात, विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या ठीकठिकाणी सभा
- महायुतीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले उद्योग गुजरातमध्ये नेल्यामुळे राज्यातली दहा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक बाहेर गेल्याची काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांची टीका
- महायुतीचं सरकार आल्यानंतरच राज्य प्रगतीपथावर पुढं गेलं असून, यानंतरही पुढंच नेऊ, अशी मुख्यमंत्र्यांची धुळ्यातल्या प्रचारसभेत ग्वाही
- इफ्फी, चित्रपट महोत्सवाच्या आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाचेचे अध्यक्ष म्हणून दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती

  **आणि**
- महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत विजयी घोडदौड कायम ठेवत भारताची जपानवर ३-० अशी मात

**<><><><><>**

राज्यात विधानसभेच्या निवडणुकीसाठी प्रचार संपायला आता,  आज आणि उद्या असे दोनच दिवस शिल्लक राहीले आहेत. आज रविवार असल्यानं विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आज ठीकठिकाणी सभा घेतल्या.

**<><><><><>**

महायुतीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले उद्योग गुजरातमध्ये नेण्यात आले, यामुळे राज्यातली दहा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक बाहेर गेली, अशी टीका काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी केली आहे. त्या आज गडचिरोली जिल्ह्यात देसाईगंज इथं आयोजित प्रचारसभेत बोलत होत्या. त्या म्हणाल्या…

**होल्ड - बाईट - प्रियंका गांधी**

केंद्र सरकार महत्त्वाची बंदरं, विमानतळ आणि अन्य सरकारी कंपन्या उद्योगपतींच्या घशात घालत असल्याचा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रात अडीच लाख रिक्त पदं असून बेरोजगारी प्रचंड वाढली आहे, युवक आत्महत्या करत आहेत, त्यांच्यासाठी काही करण्याऐवजी सरकारनं उद्योगपतींचं १६ लाख कोटी रुपयांचं कर्ज माफ केलं. हे धोरण चुकीचं आहे, असं त्या म्हणाल्या.

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर नागरिकांना २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा, तसंच शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचं आश्वासन प्रियंका गांधी यांनी दिलं. जातनिहाय जनगणना करायला आणि आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा वाढवायला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी का घाबरतात, असा सवाल त्यांनी या सभेत केला.

काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते.

प्रियंका गांधी यांनी आज नागपुरात रोड शो केला. त्याला नागरिकांची प्रचंड गर्दी दिसून आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

महायुतीचं सरकार आल्यानंतरच राज्य प्रगतीच्या मार्गावर पुढे गेलं असून, यापुढंही आपण ते पुढंच नेऊ, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धुळ्यात साक्री इथं झालेल्या प्रचारसभेत दिलं. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा यासाठी आपण केंद्र सरकारची मदत घेतली. त्यानंतर सोयाबीनला

प्रतिक्विंटल ४ हजार ८९२ रुपये किंमत देण्याचा निर्णय केंद्र शासनानं घेतल्याचं शिंदे यावेळी म्हणाले.

नंदुरबार जिल्ह्यात धडगाव इथंही त्यांनी आज प्रचारसभा घेतली. आचार संहिता संपल्यानंतर मोलगी तालुक्याची निर्मिती करण्याचं आश्वासन शिंदे यांनी या सभेत दिलं.

<><><><><>

केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नागपूर इथं वार्ताहर परिषद घेतली. राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचा महाविजय होईल, असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी यावेळी व्यक्त केला. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली महायुती सरकारनं राज्यात जी विकासकामं केली आहेत, त्यामुळे राज्यातला मतदार नक्कीच महायुतीच्या बाजूने उभा राहील, असा विश्वासही चौहान यांनी यावेळी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात रोड-शो केला.

महाविकास आघाडीची समारोपाची जाहीर सभा आज मुंबईत होत आहे. या सभेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

महाविकास आघाडीची सत्ता आल्यावर वाढवण आणि मोरबे बंदर होऊ देणार नाही, असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज बोईसर इथल्या प्रचारसभेत सांगितलं. आपण विकासाच्या नाही तर विनाशाच्या विरुद्ध असून पालघर जिल्ह्याचा विकास महाविकास आघाडी करेल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

<><><><><>

पंडित जवाहरलाल नेहरू आणि बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या नेत्यांनी लोकशाहीच्या रक्षणासाठी आपलं आयुष्य वेचलं. पण, भारतीय जनता पार्टीने मात्र देशात फूट पाडण्याचं काम केलं अशी टीका काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज केली. नागपूरजवळ उमरेड इथे प्रचारसभेत ते बोलत होते. राज्यात आता मतदारांना सरकार बदलायचं आहे आणि हे खोटं सरकार पाडायचं आहे, असं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.

त्यानंतर खर्गे यांनी सांगली इथंही प्रचारसभा घेतली. महाराष्ट्रातलं सरकार हे चोरीचं सरकार असल्याची टीका यावेळी खर्गे यांनी केला.

**<><><><><>**

राज्यातली कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते रणदीप सुरजेवाला यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या, लॉरेन्स बिश्नोई टोळीनं बॉलिवुड अभिनेत्यांना दिलेल्या धमक्या इत्यादी प्रकरणांकडे त्यांनी लक्ष वेधलं आणि या सगळ्याला महायुतीच्या नेत्यांचा पाठिंबा असल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **सांगली** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

इफ्फी म्हणजेच भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४ साठी आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाच्या अध्यक्षपदी चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता

आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा महोत्सव २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान गोव्यात आयोजित करण्यात आला आहे. आशुतोष गोवारीकर यांनी या नियुक्तीबाबत आनंद व्यक्त केला असून काळानुसार विकसित होणारा सिनेमा पाहण्यासाठी या महोत्सवापेक्षा दुसरी चांगली संधी नाही असं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत आज भारताने आज जपानवर ३-० अशी मात करत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. बिहारमध्ये राजगीर इथं हा सामना झाला. भारताच्या नवनीत कौर आणि दीपिका कुमारी यांनी आपल्या खेळाची कमाल दाखवत हा विजय मिळवून दिला. आता या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मंगळवारी पुन्हा भारताच्या संघाची लढत जपानशी होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नायजेरियाचे अध्यक्ष बोला अहमद तिनुबू यांच्याशी आज द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांमधल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा त्यांनी घेतला. संरक्षण, उर्जा, तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रात नायजेरियाबरोबरच्या भागीदारीला भारताच्या दृष्टीने महत्त्व असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं. नायजेरियातला सर्वोच्च सन्मान ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना जाहीर झाला असून त्याकरता मोदी यांनी तिनुबू यांचे आभार मानले. हा केवळ व्यक्तिशः आपला सन्मानच नव्हे तर सर्व भारतीयांचा सन्मान असून भारत – नायजेरिया यांच्यातल्या दृढ संबंधांचं प्रतीक असल्याची भावना प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या विकासात अग्रणी भूमिका निभावली असून मराठी माणसाला सक्षम बनवलं, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, मायावती यांनी आज, पुण्यात बसपा उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेतली. स्वबळावर सरकार आणण्याचा बसपाचा प्रयत्न आहे, परंतु ते मिळालं नाही तर बहुमत मिळवून सरकार बनवणाऱ्या पक्षाला आपला पाठिंबा राहील असं मायावती यांनी यावेळी जाहीर केलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांनी मतदान करुन लोकशाहीतला आपला हक्क आणि कर्तव्य बजावण्याचं आवाहन राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त विज्ञान प्रसारक डॉ. संजय पुजारी यांनी पपेट शोद्वारे केलं आहे.....

**होल्ड- बाईट - संजय पुजारी**

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.